| | |
|---|---|
| MHSO200017852018 | **नियमित दिवाणी दावा क्र. १४५/२०१८** |

## निशाण क्र. ४३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. २ शहाजी सोपान भोसले यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगीसाठी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ शहाजी सोपान भोसले हे दि. ०६/०३/२०१९ रोजी मयत झाले असून त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत,

'२अ) प्रिया शहाजी भोसले, वय २८ वर्षे, पत्नी, धंदा घरकाम,

२ब) श्रावणी शहाजी भोसले, वय ०९ वर्षे, मुलगी, धंदा शिक्षण,

२क) शिवाजी शहाजी भोसले, वय ०५ वर्षे, मुलगा, धंदा शिक्षण

प्रतिवादी क्र. २ब व २क यांची अ.पा.क. जनक आई पतिवादी क्र. १ असे.

सर्वजण रा. नराळे, ता. सांगोला, जि. सोलापूर'

सबब, वर नमूद वारसांची नावे लिहण्यासंदर्भात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादींनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा असून अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्टयार्थ त्यांनी नि.क्र. ४४ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. वादींच्या अर्जातील

कथन तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादी यांना प्रतिवादी क्र. २ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होण्यासाठी वादींनी नि.क्र. ४१ वर अर्ज दाखल केला असून तो अर्ज या न्यायालयाने मंजूर केला आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी नि.क्र. ४१ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी नि.क्र. ४१ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत अभिलेखावर सादर करावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE

Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.11.17 17:29:47 +0530

दिनांक – १७/११/२०२५.

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १७/११/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १७/११/२०२५ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १८/११/२०२५ |